दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.२६ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १२२ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 26 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 122 • Pages 4 • Rate 4 Rs

## पराभव झाला असेल तर तो आनंदच!

**मुंबई**–नगर परिषद निवडणुकीतील पराभवानंतर जळगाव जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांना 'अपशकुनी' म्हणत भुसावळमधील पराभवाचे खापर त्यांच्यावर फोडले होते. या बोचऱ्या टीकेला प्रत्युत्तर देताना एकनाथ खडसे यांनी महाजनांना चांगलेच धारेवर धरले. मी आता भाजपचा विरोधक आहे, त्यामुळे माझ्यामुळे जर भाजपचा पराभव झाला असेल तर ती माझ्यासाठी आनंदाचीच बाब आहे, असा खोचक टोला खडसे यांनी लगावला.पराभवाची जबाबदारी झटकू नका! भुसावळसह जळगाव जिल्ह्यात अनेक ठिकाणी भाजपला पराभवाचा सामना करावा लागला आहे. यावरून महाजनांवर निशाणा साधताना खडसे म्हणाले की, गिरीश महाजन आपल्या सोयीनुसार बोलतात. जिल्ह्यात ज्यांनी विजयाची जबाबदारी घेतली होती, तेच आता या पराभवाला जबाबदार आहेत. मग या पराभवाचे खापर दुसऱ्यांवर का फोडता? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच मुक्ताईनगरमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट) रिंगणातच नसल्याने तिथे आमचा पराभव झाला असे म्हणणे चुकीचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# भाजप सोडून कोणत्याही पक्षासोबत युती करा
# प्रकाश आंबेडकरांच्या जिल्हाध्यक्षांना सूचना

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असून मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी अधिकृतरित्या युतीची घोषणा केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या ऐतिहासिक घडामोडीनंतर वंचित बहुजन आघाडीनेही आपली रणनीती स्पष्ट केली असून, पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भाजप सोडून कोणत्याही पक्षासोबत युती करण्याच्या सूचना सर्व जिल्हाध्यक्षांना दिल्या आहेत. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याचे स्वागत करतानाच, ही एक चांगली गोष्ट असल्याचेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीची दिशा स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, भाजप सोडून कोणासोबतही युती करा, दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेना आणि काँग्रेस बरोबर युती केली तर चालेल, अशा सूचना आंबेडकरांनी




जिल्हाध्यक्षांना दिल्या आहेत.पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, या सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे भाजप काही ठिकाणी त्यांच्या मित्रांबरोबर चालली आहे, तर काही ठिकाणी युती करणार नाही. काँग्रेस सुद्धा काही ठिकाणी राष्ट्रवादीसोबत चालली आहे, काही ठिकाणी नाही. तीच परिस्थिती शिवसेनेची आहे. त्यामुळे एक अशी पॉलिसी नाही. ज्या महापालिका आहेत, तिथल्या अध्यक्षांना युतीसंदर्भात अधिकार देण्यात आले आहेत. त्यांनी कोणासोबत युती करता येईल याची चाचपणी करावी. मात्र, यात एकच आहे, भाजपसोबत युती करायची नाही, असे आंबेडकरांनी स्पष्ट केले.दरम्यान, शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीवर प्रतिक्रिया देताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, या युतीचे स्वागत आहे. ही चांगली गोष्ट आहे. त्यांच्या निर्णयाचे स्वागत आहे, अशी प्रतिक्रिया आंबेडकरांनी दिली आहे. महापालिकेच्या निवडणुका १५ जानेवारीला होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. त्यानुसार आता सगळेच पक्ष कामाला लागल्याचे दिसून येत आहे.

## नंदुरबारच्या अंगणवाड्यांचा 'कायापालट'; कुपोषणाविरुद्धच्या लढाईत 'तळोदा मॉडेल' राज्यासाठी ठरणार पथदर्शी!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आदिवासीबहुल नंदुरबार जिल्ह्यातील बालकांचे आरोग्य आणि अंगणवाड्यांच्या पायाभूत सुविधांना आता आधुनिकतेची जोड मिळाली आहे. 'फीडिंग इंडिया' या संस्थेच्या सहकार्याने तळोदा तालुक्यातील अंगणवाड्यांचा कायापालट करण्यात येत असून, या नाविन्यपूर्ण उपक्रमाची पाहणी मंगळवारी आमदार राजेश पाडवी आणि जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी केली.

तळोदा तालुक्यातील एकूण २६ अंगणवाडी केंद्रांच्या पुनर्विकासाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यातील दोन मॉडेल केंद्रांची पाहणी मान्यवरांनी केली. ही केंद्रे केवळ मजबूत बांधकामापुरती मर्यादित नसून, ती स्वच्छ, सुरक्षित आणि बालकांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारी बनवण्यात



आली आहेत. विशेष म्हणजे, या केंद्रांची जबाबदारी आता स्थानिक समुदायाकडे सोपवण्यात आली आहे, जेणेकरून लोकसहभागातून त्यांची देखभाल योग्य प्रकारे होईल.

**राज्यातील पहिले समर्पित केंद्रीय स्वयंपाकगृह:**–या दौऱ्यातील मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे अंगणवाडीतील बालकांसाठी उभारलेले 'केंद्रीय स्वयंपाकगृह'. महाराष्ट्रातील अशा प्रकारचे हे पहिलेच समर्पित स्वयंपाकगृह असून, याद्वारे: २१९ अंगणवाडी केंद्रांना दररोज ताजा आहार पुरवला जातो. ७,००० हून अधिक (३ ते ६ वयोगटातील) बालकांना याचा लाभ मिळत आहे. दुर्गम भागातील मुलांपर्यंत पोषणमूल्ये पोहोचवण्याची खात्री दिली जात आहे.

> **हे केंद्रीय स्वयंपाकगृह राज्यासाठी एक अनुकरणीय मॉडेल आहे. दुर्गम भागातही दर्जेदार पोषण पोहोचवणे शक्य आहे, हे या उपक्रमाने सिद्ध केले आहे. मातांनी आता आपल्या मुलांच्या आहार आणि आरोग्याबाबत अधिक सजग राहणे गरजेचे आहे.**
> **– डॉ. मित्ताली सेठी, जिल्हाधिकारी, नंदुरबार.**

> **शासन, स्वयंसेवी संस्था आणि समाज जेव्हा एकत्र येतात, तेव्हा बालकांचे भविष्य उज्ज्वल होते. फीडिंग इंडियाने केलेला हा समन्वय कुपोषणाविरुद्धच्या लढाईत मैलाचा दगड ठरेल.**
> **– राजेश पाडवी, आमदार.**

## साने गुरुजी निवासी विद्यालयाची शुभांगी घुले ची राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धे साठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी शुभांगी घुले ची महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय संघात निवड झाली आहे.दि.१५ डिसेंबर २०२५ ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यस्तरीय १७ वर्ष वयोगट शालेय बेसबॉल स्पर्धा शेवगाव, अहिल्यानगर येथे संपन्न झाल्या.या स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाचा १७ वर्ष मुलींचा संघ सहभागी झाला होता.या संघातील कु.शुभांगी सुरेश घुले ची महाराष्ट्र राज्य बेसबॉल संघात निवड झाली आहे. पुढील राष्ट्रीयस्पर्धा दिल्ली येथे संपन्न होणार आहेत. या विद्यार्थिनीची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर,तालुका क्रीडा अधिकारी,अनिकेत काळे सर केज तालुका क्रीडा अधिकारी,राखी यादव मॅडम,संघटनेचे अध्यक्ष श्री.दिनकर थोरात सर,सॉफ्टबॉलचे मार्गदर्शक सतीश राठोड सर,बेसबॉलचे मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार



सर,बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ड.उद्धवराव कराड सर,श्री.कापसे सर मार्गदर्शिका डॉ.कविता गित्ते मॅडम या सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर, श्री.तरकसे सर,कृष्णा गित्ते,केशव कराड,श्री. साखरे सर,श्री.घुले सर, श्रीमती कांदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते. सदर विद्यार्थिनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आले आहेत.

## विक्रम डोईफोडे यांची आंतरराष्ट्रीय फुले महोत्सव कवी संमेलनाच्याअध्यक्षपदी निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

देशातील मुलींची पहिली शाळा आयोजित दुसरा आंतरराष्ट्रीय फुले



महोत्सव २०२६ हा पुणे येथील एस एम जोशी फाउंडेशन सभागृह येथे दिनांक २ जानेवारी ते ५ जानेवारी यादरम्यान संपन्न होत आहे. क्रांतीसुर्य महात्मा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. साहित्यप्रेमींनी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक विजय वडवेवार यांनी केले आहे.या महोत्सवात कवी संमेलनासाठी केज तालुक्यातील कवी विक्रम डोईफोडे यांची कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे याबद्दल त्यांचे साहित्य क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

# तमाशा पाहायला गेलेल्या प्रेक्षकांत हाणामारी;अकरा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## म्हसोबा यात्रेतील तमाशाचा झाला तमाशा!

दैनिक वादळ वार्ता
**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यातील सोनिजवळा येथे भरलेल्या पारंपरिक म्हसोबा यात्रेदरम्यान तमाशाचा कार्यक्रम सुरू असताना प्रेक्षकांमध्ये झालेल्या हाणामारीने वातावरण ढवळून निघाले. या मारामारीत एका व्यक्तीस दुखापत झाली असून अकरा जणांविरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरवर्षीप्रमाणे गावात म्हसोबा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेदरम्यान गाडे ओढणे, कुस्त्या, शोभेची दारू तसेच तमाशा अशा विविध पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भाविक, ग्रामस्थ तसेच परगावी असलेले गावकरी यात्रेला उपस्थित होते.

दि. २१ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ९ वाजता तमाशाचा फड सुरू असताना प्रेक्षकांपैकी सुधीर प्रकाश वैरागे हे कलाकारांना बक्षीस देण्यासाठी स्टेजवर गेले. त्याचवेळी उपस्थित असलेल्या काही व्यक्तींनी वाद घालत त्यांना काठी व लोखंडी पाईपने मारहाण केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या मारहाणीत सुधीर वैरागे यांच्या उजव्या भुवईवर व हातावर इजा झाली. भांडण सोडविण्यास गेलेल्या नातेवाईकांनादेखील मारहाण केल्याचे सांगितले जाते.

या प्रकरणी सुधीर वैरागे यांच्या फिर्यादीवरून अशोक निवृत्ती वैरागे, राजू निवृत्ती वैरागे, वसंत निवृत्ती वैरागे, कृष्णा शंकर वैराणे, प्रभू मस्सा वैरागे, विशाल प्रभू वैरागे, प्रताप अशोक वैरागे, आकाश अशोक वैरागे, सचिन साहेबराव वैसगे, गणेश साहेबराव वैरागे आणि शौर्या उत्तरेश्वर लोंढे या अकरा जणांविरुद्ध गु. र. नं. ३२५/२०२५ अंतर्गत संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे करीत आहेत

## कर्जत नगरपरिषदेच्या गटनेते पदी संतोष पाटील

दैनिक वादळ वार्ता
**कर्जत । प्रतिनीधी**

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीत परिवर्तन विकास आघाडीचे शिल्पकार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन दादा सावंत यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला घवघवीत यश मिळाले असून ६ पैकी ५ जागेवर विजयी संपादन केला आहे. आज बुधवार दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी संपर्क कार्यालय शिवालय येथे उपजिल्हा प्रमुख नितीन दादा सावंत यांनी निवडून आलेले ज्येष्ठ नगरसेवक संतोष दादा पाटील यांची कर्जत नगर परिषदेच्या गटनेते पदी नियुक्तीची घोषणा केली.ठाकरे शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक संतोष दादा पाटील हे मुद्रे प्रभाग क्रमांक ३ (ब) येथून ९३६ मते मिळवून १२८ मतांची आघाडी घेत विजयी सलामी दिली. शिवसेनेचे खंदे समर्थक असलेले संतोष दादा पाटील हे ३ वेळा तर त्यांची पत्नी १ वेळा निवडून येत त्यांची यशस्वी राजकीय कारकीर्द आजपर्यंत आहे. जेष्ठ नगरसेवक संतोष पाटील यांनी सन २००९, २०१४, तर २०१९ मध्ये त्यांची पत्नी सौ. संचिता संतोष पाटील तर आता २०२५ मध्ये पुन्हा एकदा संतोष दादा पाटील यांनी विजयाची बाजी मारली आहे.




. त्यामुळे कर्जत नगर परिषदेच्या गटनेतेपदी निवड करून आज सर्वानुमते उपजिल्हा प्रमुख नितीन दादा सावंत यांनी शिवालय येथे त्यांच्या नावाची घोषणा केली, व त्यांचेशाल व पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन दादा सावंत, कर्जत तालुका प्रमुख बाजीराव भाई दळवी, संपर्क प्रमुख भिमसेन दादा बडेकर, संघटक माधव कोळंबे, माजी सभापती पंढरीनाथ राऊत, शहरप्रमुख निलेश घरत, नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांत पाटील, नगरसेविका मानसी कानिटकर, नगरसेविका सुचिता खोत, महेंद्र कानिटकर व इतर शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी सर्वांनी गटनेते संतोष दादा पाटील यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## वास्तव कट्टा

भीमराया तुझे ऋण अपार
धुळीच्या वाटेवर चालतच गेलास,
अंधाऱ्या रातीत दिवा तू झालास,
तळहातावरती जखमा घेऊन,
अन्यायाच्या भिंतींशी भिडतच राहिलास.
तुझ्या विचारांची ज्योत पेटती,
मनामनात ती आजही चेतती,
समतेचा संदेश देत देत,
कष्टकऱ्यांच्या ओठी हास्य फुलवीत.

कायद्याचा तू शिल्पकार महान,
विद्येचा साक्षात तूच देवस्थान,
झुंज तुझी होती माणुसकीसाठी,
हक्क व स्वाभिमान मिळवण्यासाठी.
भीमराया, तुझे ऋण आम्हा अपरंपार,
तुझ्यामुळेच उजळला आमुचा संसार,
तुझ्या विचारांची वाटचाल अखंड राहो,
समतेचा संदेश प्रत्येक अंतरी वाहो.

## संपादकीय

# घेतला वसा टाकू नये



असामी-काळजीवाहक सरकार, मत पूछो मेरा कारोबार क्या है, मोहब्बत की छोटी सी दुकान है इस बाजार में... अंगातलं सारं बळ एकवटून मदत करण्याची ताकद असलेला तो किंवा ती म्हणजे, सामान्यातली असामान्य माणसं होत. सर्वसामान्यांच्या डोक्यावर भक्कम आधाराचा हात असणं ही त्यांची खूण, जी जगायला उद्युक्त करते. आपला हात जगन्नाथ असणारी मोजकीचं माणसं वेळेवर मदतीला येतात. वाईट घटनेत, दु:खद प्रसंगी तुमच्याबरोबर खंबीर उभ्या असलेल्या माणसांना विसरायचं नसतं, हा नियम मागील पिढी पाळत आलीय; आपणही त्यांचं अनुकरण करून सदैव साथ देणाऱ्या खंबीर मनाच्या माणसांचा आदर्श धरायला हवा. मन, हृदय हे प्रत्येकात असलं तरी त्यात वसलेला चांगुलपणा हा फक्त आणि फक्त मोठ्या मनाच्या लोकांकडे पाहायला मिळतो. अंतकरणात सामावलेला ईश्वर आपल्या जवळ येतो, तो केवळ इच्छापूर्तीने आणि योगायोगाने. चांगुलपणाची किर्ती पसरायला वेळ लागत नाही. चांगल्या गोष्टीचं गुणगान करताना दाद देणं, वाईट गोष्टीकडे दुर्लक्ष करणं आणि अधिक चांगला मार्ग शोधून उत्कृष्ट कार्यक्षमता निर्माण करणं हे या प्रकारातल्या निस्वार्थी लोकांना जमतं. आणीबाणी प्रसंग, अटीतटीची वेळ, अतिव दु:खाचे डोंगर पार करण्यासाठी तत्पर असणाऱ्या व्यक्ती आपल्यासाठी उत्तुंग आणि प्रतिभावान ठरतात ते या साठीचं.देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, या म्हणीचा मूळ उद्देश लक्षात घेता, एखाद्याकडून कोणत्याही प्रकारची मदत घेताना त्याची त्या मागची किमान भावना लक्षात घेणं गरजेचं ठरतं; नाही तर नुसतचं घेत रहाणाऱ्यांची संख्या इथं कमी नाही. बोट पकडताना हात ओढून घेण्याची मानवाची कूपमंडूक वृत्ती मदत करणाऱ्याला, त्याच्या मदतीला अडथळा आणू शकते. मदत याचा अर्थ वेळेनुरूप करण्यात आलेली ऐच्छिक कृती. सत्याची वस्तुस्थिती जाणून, इच्छेने समस्येचे निराकरण करणं, त्यातून उत्कृष्ट कार्यक्षमता साधणं, या हाताने केलेलं कार्य त्या हाताला न कळणं, भावना आणि कल्पनांच्या आहारी न जाता कृतीशीलतेने वस्तुस्थितीला आकार देण्याच्या प्रयत्नात स्वतःकडून सर्वस्वी सहकार्य देऊन वास्तवाशी एकरूप होणं या कामाला मदत ही उपाधी देता येईल. अशी माणसं कर्तव्यासाठी मागेपुढे पाहत नाहीत. माझ्याकडून जेवढं होईल तेवढं सहकार्य आणि कर्मफळाची अपेक्षा न बाळगण्याची इच्छा त्यांच्याजवळ असते. आपल्या असण्याने समोरच्या दु:खी, कष्टीताला येणारं लाखोंच बळ कर्तव्यपूर्तीचे समाधान घेऊन ही कर्तव्यदक्ष माणसं वावरत असतात. ही माणसं आपल्या अवतीभवती असतात म्हणून आपण मोकळा श्वास घेऊ शकतो.आपली सगळी मदार यांच्या खांद्यावर पेललेली असते. तेव्हा त्यांना विसरणं अशक्यप्राय होय. ज्यांची आयुष्यात कसुभर का होईना मदत झाली असेल त्याची जाणिव मनात जपायला हवी. आई, वडील, बहीण, भाऊ, मित्र, मैत्रिणी, ओळखीचे कोणीही असो त्याच्या प्रति जाणीव असायला हवी. अशी माणसं देव माणसासारखी असतात; नव्हे ती आपल्यासाठी देव माणसचं असतात. जिथं नाही कुणी तिथं देव उभा मनी. देव पांडुरंग माणसाच्या रूपाने भक्ताच्या हाकेला धावतो. गोऱ्या कुंभाराच्या मातीत सत्व ओतणारा, सावत्या माळ्याच्या उभ्या शेतात मळा फुलवणारा सखा पांडुरंग तन-मन-धनाने भक्ताला पावतो. तसाचं शंभरातला एखादा माणूस, त्या माणसातला देव संकटात मदतीला उभा ठाकतो. परीस्थितीतीला तारण्याचं बळ देतो. हाताच्या दोन्ही बाहूंची ताकद, सर्वस्व पणाला लावत, उभं करतो आपणास. परिस्थिती मानवाला शिकवते पण परिस्थितीचा फायदा घेऊ नये असे म्हणताना मदतीच्या वेळी धावणाऱ्या लोकांप्रति आदर सद्भावना ठेवणं, त्यांच्या अमूल्य वेळेचा, सामाजिक जाणीवेचा कृतकृत्य भाव आपल्यात जागृत ठेवणं या प्राथमिक तत्त्वांच मूल्य जाणणं, त्यांच्यातल्या समर्पणाचं भान राखणं, एवढं जरी आपण केलं तरी, त्यांच्या चिन्मय सद्भावना सदैव आपल्या पाठीशी राहतील. श्रम आणि मदतीचा आनंद देणारी अशी माणसं आपल्या आसपास असताना त्यांच्याप्रति निष्ठा बाणायला हवी. सत्कारणी लागणारी मदत एखाद्यास करावी, पण मदत करणाऱ्या दानशूरांना मात्र विसरू नये. या परंपरेत ऊतू नये, मातू नये, घेतला वसा टाकू नये ची शिकवण सार्थ ठरेल. आपलं मनोधैर्य खचू न देणाऱ्या, आपल्यावर प्रेम करणाऱ्या आणि आपणास शिडीसारख्या उपयोगी ठरणाऱ्या माणसांच्या चांगुलपणाचा विजय असो. तो आपल्या अंतःकरणात साजरा होओ. परतीच्या अपेक्षेने न केलेले, जीवनअंशाचे खरे कर्म तसचं दानधर्माच्या सत्कृत्याने संचयातील धन कधीचं आटत नाही. मान, दान आणि ज्ञान या गोष्टीसह कृपावंत मदत ओंजळीत भरून घेताना, भरून सांडलेले मातीत मिसळण्यापूर्वीचं हे दानकरी हात सांभाळायला हवेत. दान देण्यासाठी पसरलेले कृपावंत हात या जगाची नाव हाकतात हे तंतोतंत खरयं, तेव्हा आपल्यासारख्या तमाम गरजूंना उपयोगी ठरणाऱ्या महान व्यक्तिविषयी आदर बाळगणं आणि तो व्यक्त करणं नेहमीच उचित आहे.

# देहदान चळवळीचा शुभारंभ आपल्या पासूनच घरापासून संध्याताई बारगजे, दत्ता बारगजे यांचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

नाशिवंत देह,जाणार सकळ पण मरणोत्तरही समाजाच्या उपयोगी यावा या उदात्त आणि मानवता वादी विचारातून इन्फंट इंडियाचे संचालक सामाजिक कार्यकर्ते दत्ता बारगजे व त्यांच्या पत्नी सौ.संध्याताई बारगजे यांनी देहदान चळवळीचा प्रेरणादायी शुभारंभ आपल्या घरापासूनच केल्याचे समाजात कौतुकास्पद उदाहरण घडले आहे.संध्याताई बारगजे यांचे वडील व दत्ता बारगजे यांचे सासरे श्री.गणपतराव यशवंता चाटे रा.तांबवा ता.केज यांची प्रकृती चिंताजनक असतानाच,कुटुंबीय व नातेवाईकांच्या समुपदेशनातून सर्वांच्या संमतीने देहदानाचा निर्णय घेण्यात आला.हा निर्णय केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित न राहता समाजाला दिशा देणारा ठरला आहे. श्री.गणपतराव चाटे हे आनंदग्राम येथील गो शाळेत तब्बल १५ वर्षे गायींच्या सेवेत कार्यरत होते.गोसेवा,साधेपणा, प्रामाणिकपणा व कर्तव्यनिष्ठा हेच त्यांच्या जीवनाचे मूलमंत्र होते. कोणतीही अपेक्षा न ठेवता



त्यांनी आयुष्यभर सेवा केली.काही महिन्यांपूर्वी हायवेवरून रस्ता ओलांडत असताना झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर जवळपास चार महिने ते खाटेवर होते. विशेष म्हणजे त्यांना मधुमेह (शुगर) किंवा रक्तदाब (बीपी) असा कोणताही आजार नव्हता.मात्र नियतीपुढे अखेर मान झुकवावी लागली.जिवंतपणी समाजासाठी सेवा केली, तर मरणोत्तरही समाजाच्या उपयोगी पडावे या भावनेतून देहदानाचा संकल्प करण्यात आला.या अनुषंगाने वैद्यकीय महाविद्यालय,अंबाजोगाई येथे देहदानासाठी आवश्यक असलेल्या सर्व वैद्यकीय व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या.सदर देह एचआयव्ही बाधित नसल्याने वैद्यकीयशिक्षण व संशोधनासाठी देहदान करण्यात आले आहे.

श्री.गणपतराव चाटे यांची प्राणज्योत मालवताच आनंदग्राम येथेच अंतिम श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.त्यानंतर नियमानुसार देह वैद्यकीय महाविद्यालय,अंबाजोगाई यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.या प्रसंगी उपस्थितांनी या निर्णयाला भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.देहदान ही केवळ वैद्यकीयशिक्षणाची गरज नसून ती विज्ञान, मानवता आणि समाज प्रबोधनाची चळवळ आहे. या चळवळीच्या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अमूल्य योगदान मिळते, तर समाजात मरणोत्तर जीवनालाही अर्थ प्राप्त होतो.ही देहदान चळवळ अधिक व्यापक आणि गतिमान व्हावी,यासाठी पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,युवक-युवती व समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी पुढाकार घ्यावा,असे नम्र आवाहन दत्ता बारगजे व सौ.संध्याताई बारगजे कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

देहदानाच्या माध्यमातून समाजाला विज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि मानवतेची नवी दिशा देणारा हा निर्णय अनेक कुटुंबांसाठी आणि समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# अहिल्यानगरच्या लेकींची राज्यस्तरावर टेनिस क्रिकेट स्पर्धेत विजयाची 'हॅट्रिक'-राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

## स्वामिनी जेजुरकर हिला सर्वोत्कृष्ट महिला खेळाडूचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या टेनिस क्रिकेट मुलींच्या संघाने राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत शानदार कामगिरी करत सलग तिसऱ्यांदा विजेतेपदाची हॅट्रिक साधली आहे. सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथे टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने १८, १९ व २० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगरच्या मुलींनी आपले वर्चस्व दाखवून उत्कृष्ट कामगिरी केली. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील तब्बल २४ जिल्ह्यांचे संघ सहभागी झाले होते. अहिल्यानगर जिल्ह्याच्या मुलींच्या व मुलांच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या आणि उत्कंठावर्धक लढतींमध्ये अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपद मिळविले.

विशेष म्हणजे, हा संपूर्ण संघ सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय, राहुरी कृषी विद्यापीठ या शाळेचा असून, मागील वर्षी अमरावती येथे झालेल्या शालेय राज्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतही या संघाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला होता. यंदाही त्याच सातत्यपूर्ण आणि शिस्तबद्ध खेळाच्या जोरावर त्यांनी सलग तिसऱ्यांदा राज्यविजेतेपद




मिळवून इतिहास घडविला आहे.

अंतिम सामना सातारा जिल्ह्याच्या संघासोबत अतिशय अटीतटीचा ठरला. शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्यात अवघ्या एक धावेने अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने विजय मिळवत तिसऱ्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले. या विजयात संघाच्या कर्णधार स्वामिनी कविता गोरक्षनाथ जेजुरकर हिने उत्कृष्ट नेतृत्व करत उल्लेखनीय भूमिका बजावली. तिच्या उत्कृष्ट खेळासाठी तिला सर्वोत्कृष्ट महिला खेळाडूचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच वृषाली पारधी हिला तिच्या दमदार कामगिरीसाठी 'वूमन ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरविण्यात आले.

या शानदार कामगिरीच्या जोरावर अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाची राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थिनींच्या या ऐतिहासिक यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू तसेच सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास खर्चे, सभापती डॉ. प्रमोद रसाळ, सचिव डॉ. महानंदजी माने, खजिनदार महेश घाडगे, विद्यालयाचे प्राचार्य अरुणजी तुपविहीरे, उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याशिवाय टेनिस क्रिकेट असोसिएशन इंडिया तसेच महाराष्ट्राच्या सचिव मीनाक्षी गिरी, सहसचिव चंद्रकांत तोरणे, अहिल्यानगर जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष केशव नागरगोजे, खजिनदार संदीप घावटे यांनीही संघाचे कौतुक केले. विद्यार्थिनींना शाळेचे क्रीडाशिक्षक व प्रशिक्षक घन:श्याम सानप, संतोष जाधव, राष्ट्रीय टेनिस क्रिकेट खेळाडू अक्षदा बेल्हेकर तसेच शहर टेनिस क्रिकेट सचिव प्रसाद सामलेटी, नितीन केने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**मुलींचा विजयी संघ :** स्वामिनी जेजुरकर (कर्णधार), वृषाली पारधी, तृप्ती उगलमुगले, प्रणाली पानसंबळ, सिमरन शेख, नशरा सय्यद, संतोष भिसे, मृणाल ननवरे, श्रेया सोनवणे, धनश्री पवार, राशि पवार, धनश्री शेडगे, लक्ष्मीप्रिया म्हसे, आदिती गुंजाळ, अमृता ढगे, श्रावणी अडसुरे.

# स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा अविष्कार-ॲड.विश्वासराव आठरे पाटील






दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

स्नेहसंमेलनाचा उद्देश हा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन व वाव देणे हा असतो त्यामुळे शालेय महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थ्यांच्या जीवनात या सोहळ्याला अनन्यसाधारण महत्त्व असतं त्यामुळे अभ्यासाच्या धामधुमीत त्यांच्यातील सृजनशीलता अभिव्यक्त होण्यासाठी स्नेहसंमेलन महाविद्यालया मधून होणे गरजेचे आहे या संमेलनांमधून आपल्या देशातील अनेक देशभक्त महान विभूतींच्या आदर्शांवर नवीन पिढी वाटचाल करण्यासाठी हा सोहळा मार्गदर्शक व प्रेरक आहे असे प्रतिपादन न्यू आर्ट्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील यांनी केले. न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन सोहळा नुकताच संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून शिवशाहीर पृथ्वीराज माळी हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे पाटील हे होते यावेळी विचारपिठावर, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त जयंत वाघ, सदस्य अरुणाताई काळे, निर्मलाताई काटे, राजेंद्र मोरे, अलकाताई जंगले, कॅप्टन चौधरी साहेब, राधाकृष्ण आढाव, संस्था निरीक्षक प्रा .उत्तमराव राजळे, हरिभाऊ जावळे, प्राचार्य डॉ .बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य डॉ अनिल आठरे, प्रा कल्पना कानवडे, प्रा सुभाष गोरे, प्रा .जयश्री हापसे, बबन साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा .कल्पना कानवडे यांनी केले यावेळी कार्याध्यक्ष प्रा.जयश्री हापसे यांनी महाविद्यालयाचा अहवाल वाचन केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मिळवलेल्या विविध स्पर्धा परीक्षा मध्ये त्यांना जे उत्तुंग यश प्राप्त झाले त्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांचा यावेळी उपस्थित मान्यवर व पाहुण्यांच्या हस्ते यथोचित सन्मान गौरव करण्यात आला. गुणवंत यशवंत प्राध्यापक शिक्षक यांचाही सन्मान सत्कार यावेळी करण्यात आला यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी हे कनिष्ठ महाविद्यालयाचे देदीप्यमान यश पाहून माननीय प्राचार्य उपप्राचार्य व पर्यवेक्षक यांचे कौतुक केले. प्रमुख अतिथी शिवशाहीर पृथ्वीराज माळी यांनी यावेळी शाहिरी कार्यक्रम सादर करत आपले मनोगत व्यक्त केले त्यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात सांगितली की लोकशाहीरी हा लोकपरंपरेचा सोहळा आहे शाहिरी हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असून इतिहासाचे व पराक्रमाचे पोवाडे कथन करण्यासाठी हा प्रकार महत्त्वाचा आहे समाजाला प्रबोधित करताना एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरा हस्तांतरित करताना त्यामुळे सांस्कृतिक सातत्य टिकून राहते आधुनिक काळामध्ये शाहिरी आणि लोककला सामाजिक संदेश देण्याचे आणि लोककला एकत्र आणण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरांचं व मूल्यांचं जतन करण्यासाठी या लोककला महत्त्वाचे प्रतीक आहेत शाहिरी मधून आपल्याला शक्ती आणि चैतन्य प्राप्त होते आणि या चैतन्य आणि शक्तीच्या जोरावर शिवछत्रपतींनी स्वराज्याची स्थापना केली असा हा सुंदर कार्यक्रम आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाने या किशोरवयीन मुलांसाठी ठेवला महाविद्यालयाचे व संस्थेचे यावेळी त्यांनी कौतुक केले व आपला शाहिरी कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे पाटील यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की सध्या स्नेहसंमेलनाची स्थिती बदलत आहे त्याची स्वरूप बदलत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मप्रगटीकरणाला संधी देण्यासाठी अशी सोहळे होणं सध्या गरजेचं आहे नवीन पिढी मधील नवीन नेतृत्व निर्माण करण्यासाठी समाजाला समाज प्रबोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना उपक्रमशील बनवण्यासाठी आपल्याला अशा कार्यक्रमांची आज नितांत आवश्यकता आहे या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व घडली जातात असे त्यावेळी ते म्हणाले तसेच त्यांनी त्यावेळी महिलांचं शिक्षण सबलीकरण हे किती गरजेचं आहे यावरही प्रकाश टाकला असून उपेक्षित वर्गाकडे आपण लक्ष देणं सध्या गरजेचे असून त्यांना मुख्य शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे असेही यावेळी त्यांनी नमूद केले. असे हे वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व स्नेहसंमेलन राष्ट्रीयत्वाची उंची वाढवतात पुढच्या पिढीला घडवण्यासाठी कृतिशील विचार देण्याची आज नितांत गरज आहे असे ते म्हणाले व यशवंत गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व न्यु आर्ट्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या या देदीप्यमान , उज्वल परंपरेचे कौतुक केले. यावेळी कार्यक्रमाचे आभार सुभाष गोरे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले यावेळी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येडेश्वरी साखर कारखान्याची ऊस गाळपात दमदार कामगिरी

# ५४ दिवसांत ४ लाख मे.टन ऊस गाळप पूर्ण-खा.बजरंग सोनवणेंची माहिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (ता. केज) येथे सन २०२५-२६ या चालू गळीत हंगामात अवघ्या ५४ दिवसांत तब्बल ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा महत्त्वाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. कारखान्याचा बारावा गळीत हंगाम सध्या पूर्ण क्षमतेने सुरू असून, नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे गाळपाचे उद्दिष्ट वेगाने साध्य होत आहे, अशी माहिती कारखान्याचे चेअरमन खा.बजरंग सोनवणे यांनी दिली आहे.

दररोज सरासरी सुमारे ९ हजार टन ऊस गाळप होत असून, शेतकऱ्यांच्या ऊसाला वेळेवर आणि अडथळेविना गाळप मिळत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गळीत हंगामाच्या सुरुवातीपासूनच काटेकोर नियोजन, यंत्रसामग्रीची तत्पर देखभाल आणि कामगारांचे नियोजन यामुळे गाळपाचा वेग कायम ठेवण्यात कारखाना प्रशासनाला यश आले आहे. ऊस गाळपाबरोबरच कारखान्यांतर्गत कार्यरत असलेला २६ मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्पही प्रभावीपणे सुरू आहे. आजअखेर या प्रकल्पातून एकूण १ कोटी ९३ लाख ६४ हजार २०० युनिट वीज निर्मिती करण्यात आली असून, त्यापैकी ७२ लाख ५४ हजार ९०० युनिट वीज महावितरण कंपनीला निर्यात (एक्सपोर्ट) करण्यात आली आहे. त्यामुळे कारखान्याला अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला असून, ऊर्जानिर्मिती क्षेत्रातही येडेश्वरी साखर कारखान्याने आपली क्षमता सिद्ध केली आहे. कारखान्याच्या कार्यक्षम व दूरदृष्टीपूर्ण व्यवस्थापनामुळे गाळप आणि वीज निर्मिती या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती होत आहे. याचा थेट फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होत असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. आगामी काळातही अशीच कामगिरी कायम राखत शेतकऱ्यांचा विश्वास दृढ करण्याचा संकल्प कारखाना प्रशासनाने व्यक्त केला आहे.



### डिस्टिलरीत मोठी झेप

**डिस्टिलरी विभागाकडील गळीत हंगाम २०२५-२६ चे प्रत्यक्ष उत्पादन दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी चालू होऊन २८३६४ मे.टन सिरप पासून ७९,९७,२०४ ब.ली.आर.एस.चे उत्पादन झालेले आहे. तसेच ५८३४ मे.टन बी हेवी पासून १६,९६,९४० ब.ली.आर.एस असे एकूण आर.एस.९६,९४,१४४ चे उत्पादन झाले आहे. सदर उत्पादित सिरप आर.एस.पासून ६३,८९,९३२ ब.ली.इथेनॉल व बी हेवी आर.एस.पासून २,७४,६०८ इथेनॉल असे एकूण ६६,६४,५४० ब.ली.चे उत्पादन झाले आहे. उर्वरित आर.एस. २६,९६,३७७ लाख लिटर आर.एस.साठा शिल्लक आहे. उत्पादित झालेल्या इथेनॉल पैकी ४९,९५,००० ब.ली.ची ऑईल कंपनीना विक्री झालेली असून आज उर्वरित १६,६९,५४० ब.ली. इथेनॉल शिल्लक आहे.**

# ग्रामपंचायत भुजगाव येथे राष्ट्रीय पेसा दिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

धडगाव तालुक्यातील भुजगाव ग्रुप ग्रामपंचायत राष्ट्रीय पेसा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी कुलदैवत याहा मोगी माता धरती आबा बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळा हरणखुरी व जिल्हा परिषद शाळा भुजगाव येथील विद्यार्थ्यांनी स्वागतपर सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली.



कार्यक्रमास ग्रामपंचायत परिसरातील सर्व अंगणवाडी सेविका, आशाताई, शिक्षकवर्ग, ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, सरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना पेसा दिनाचे महत्त्व व ग्रामसभेचे अधिकार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी जिल्हा परिषद शाळा भुजगाव येथील मुख्याध्यापक सुभाष पावरा सहशिक्षक अर्चना राठोड तसेच जिल्हा परिषद शाळा हरणखुरी येथील मुख्यध्यापिका बेबी सूर्यवंशी व सहशिक्षिका ज्योती पावरा यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

राष्ट्रीय पेसा दिनाचे औचित्य साधत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात जिल्हा परिषद शाळा हरणखुरी व भुजगाव येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध दुकानं लावली होती. या दुकानांतून उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांनी खरेदी केली. विद्यार्थ्यांना बाजारपेठेचे व्यवहार समजावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच अर्जुन पावरा

होते. हरणखुरी गावातील ज्येष्ठ नागरिक ठुमला पावरा यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. ग्रुप ग्रामपंचायत भुजगावचे ग्रामविकास अधिकारी मोहनलाल वळवी यांनी पेसा दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. तर सरपंच अर्जुन पावरा यांनी पेसा कायद्याविषयी सविस्तर माहिती दिली. ग्रामस्थ राकेश पावरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षकवर्ग व ग्रामस्थांनी सहकार्य केले. राष्ट्रीय पेसा दिनानिमित्त ग्रामपंचायत परिसरात गावात जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले.

**राष्ट्रीय पेसा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमातून ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना पेसा कायद्याची उपयुक्त माहिती मिळाली. ग्रामसभेचे अधिकार, स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत होण्यासाठी पेसा कायद्याचे महत्त्व याची जाणीव सर्वसामान्य नागरिकांना झाली. बाल आनंद मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान मिळाल्याने हा उपक्रम विशेष कौतुकास्पद असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली**

**रविंद्र पावरा,ग्रामस्थ**

# ज्ञानेश्वर मेंडके यांचा वाढदिवस विवीध सामाजिक उपक्रमांनी साजरा



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांच्या वाढदिवसानिमीत्त बॅनरबाजी वरील अनावश्यक खर्च टाळत विवीध उपक्रम राबवत सामाजिक बांधीलकी जोपासली.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीच्या सामाजिक उपक्रमात भारतीय जनता पार्टी माजलगाव यांच्या कडुन गोशाळा देवखेडा ११००० हजार देणगी व बाळासाहेब गायकवाड यांच्या कडून मूकबधिर निवासी विद्यालय माजलगाव येथे विद्यार्थ्यांना भोजनाची व्यवस्था व लक्ष्मण गायकवाड यांच्या कडून पालावरील गोरगरिबांना ब्लँकेट वाटप नंदू भाऊ ऊंडे जॅकी इनामदार यांच्या कडून ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव येथे ५१ झाडांचे वृक्षारोप केले सह्याद्री प्रतिष्ठान कडून मुख बधिर निवासी विद्यालय माजलगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप यावेळी उपस्थित अरुण आबा राऊत शिवाजीराव रांजवन डॉ.अशोक तिडके विनायक रत्नपारखी रूपालीताई कचरे अभिजीत सोळंके अभय भैया होके ईश्वर आप्पा खुर्पे नारायण सोनवणे माजी नगरसेवक आशोक आळने शरद कचरे लक्ष्मण गायकवाड विनोद लड्डा कल्याण शेप सहाजी शहाजी सोळंके विशाल शिंदे संतोष जाधव राम शिंदे पवनजी मोगरेकर कैलास खुर्पे नारायण मेंडके अनिस शेख सिद्धेश्वर राठोड दिलीपराव सोळंके विलास नेमाने अविनाश गायकवाड आकाश पवार जॅकी इनामदार बबनराव सूरवशे बाळासाहेब शिरसागर अजीम पठाण सुभाष कांबळे श्रीपद धिरडे रवी गायकवाड बाळू मेंडके किट्टिआडगाव सर्कल दत्ता जाधव मच्छिंद्र मेंडके सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी माजलगाव व स्वराष्ट्र मित्र मंडळ सदस्यांनी परिश्रम घेतले.

# नंदुरबारमध्ये भाजपला रोखण्यासाठी वोट जिहाद;डॉ.हिना गावित यांचा घणाघाती आरोप

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार नगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला मिळालेला विजय हा विकास किंवा हिंदुत्वाचा नसून तो निव्वळ 'वोट जिहाद'चा विजय आहे. भारतीय जनता पार्टीचा विजय निश्चित असल्याचे पाहून शिवसेनेचे नेते चंद्रकांत रघुवंशी यांनी एमआयएम सारख्या कट्टरतावादी पक्षाशी छुपी युती केली, असा खळबळजनक आरोप माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

नंदुरबार नगरपालिकेच्या निवडणुकीत सत्ताधारी शिंदे गटाच्या शिवसेनेने आपली सत्ता राखली असली, तरी भाजपने या निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आकडेवारीनिशी 'वोट जिहाद'चा मुद्दा लावून धरला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. हिना गावित यांनी मतदानाचे विश्लेषण मांडले. त्या म्हणाल्या की, नंदुरबार शहरात ७५ हजार मतदान झाले, त्यापैकी ५४ हजार हिंदू मते होती. भाजपचे उमेदवार अविनाश माळी यांना ३०,५३१ मते मिळाली, तर शिवसेनेच्या विजयी उमेदवार रत्ना रघुवंशी यांना ४१,६४१ मते मिळाली. मात्र, रघुवंशी यांना मिळालेल्या मतांमध्ये तब्बल १८ हजार मते ही मुस्लीम समाजाची आहेत. याचाच अर्थ, हिंदू मतदारांनी भाजपलाच पसंती दिली आहे.

**एमआयएम आणि रघुवंशी यांच्यात 'फिक्सिंग'?:-**

डॉ. गावित यांनी असा दावा केला की, मुस्लीम मतदारांनी नगरसेवक पदासाठी एमआयएमला आणि नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेला मतदान केले. एमआयएमच्या उमेदवारांना एकूण १०,१७९ मते मिळाली, मात्र नगराध्यक्ष पदासाठी ही सर्व मते शिवसेनेच्या पारड्यात गेली. हा केवळ भाजपला रोखण्यासाठी केलेला प्रयोग होता. रघुवंशी हे केवळ नावापुरते हिंदुत्ववादी असून त्यांचे विचार आजही काँग्रेसचेच आहेत, अशी टीका त्यांनी केली.

नंदुरबारमध्ये पहिल्यांदाच एमआयएमचे चार नगरसेवक निवडून येणे आणि रस्त्यावर हिरवा गुलाल उधळला जाणे ही शहराच्या अस्मितेसाठी आणि सुरक्षिततेसाठी धोक्याची घंटा असल्याचे डॉ. गावित यांनी नमूद केले. विशिष्ट समुदायाचे झालेले संघटन भविष्यात शहरासाठी घातक ठरू शकते, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

भाजपच्या निवडून आलेल्या नगरसेवकांमधून आनंदा माळी यांची गटनेतेपदी, तर हिरालाल चौधरी यांची विरोधी पक्षनेता म्हणून निवड करण्यात आली आहे.

भाजपचे २६ उमेदवार हे नवखे होते, तरीही त्यांनी कडवी झुंज दिली.महापालिकेत प्रबळ विरोधी पक्ष म्हणून भाजप हिंदू मतदारांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या पत्रकार परिषदेला भाजपचे सर्व विजयी आणि पराभूत उमेदवार उपस्थित होते. या आरोपामुळे आता नंदुरबारच्या राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडाली असून शिवसेनेकडून यावर काय उत्तर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिवाचीवडीचे सुपुत्र लक्ष्मण चौरे भारतीय रेल्वेत सेवेसाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जिवाचीवडी (ता. केज) येथील लक्ष्मण आसाराम चौरे यांची भारत सरकारच्या भारतीय रेल्वे सेवेसाठी निवड झाली असून त्यांच्या या यशाबद्दल परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून त्यांनी हे यश संपादन केले आहे.

लक्ष्मण चौरे यांचे घर गावापासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या टक्करा वस्तीवर आहे. शेतीमजुरी करून आई-वडिलांनी मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या शिक्षणात मामा श्री. दादासाहेब फुंदे यांचे मोलाचे सहकार्य तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले, असे चौरे यांनी सांगितले.त्यांचा शैक्षणिक प्रवास साने गुरुजी आश्रम शाळा, केज येथून सुरू झाला.



प्राथमिक शिक्षणानंतर घरची परिस्थिती बेताची असल्याने मामांनी त्यांना खडकोनी (ता. बार्शी) येथे शिक्षणासाठी नेले आणि तेथे दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण झाले. बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात १२ वी, तर पुढील इंजिनिअरिंगचे शिक्षण राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पूर्ण केले. घरची जबाबदारी लक्षात घेऊन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी खाजगी कंपनीत नोकरी करत अभ्यास सुरू ठेवला. दोन टप्प्यांत झालेल्या परीक्षेत त्यांनी यश मिळवले. पहिली परीक्षा १६ डिसेंबर २०२४ रोजी, तर दुसरी परीक्षा २२ एप्रिल २०२५ रोजी झाली. त्यानंतर ३० जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ दरम्यान वैद्यकीय परीक्षा व कागदपत्रांची पडताळणी झाली. अखेर २४ डिसेंबर २०२५ रोजी अंतिम निकाल घोषीत होऊन त्यांची भारतीय रेल्वेत निवड निश्चित झाली.

लक्ष्मण चौरे यांनी सांगितले, माझे आजचे यश संघर्षातून मिळाले आहे. घराजवळ कोणतीही शैक्षणिक सोय नसताना सतत प्रयत्न करत राहिलो. कुटुंबीय, नातेवाईक व शिक्षकांनी दिलेले पाठबळ माझी प्रेरणा ठरले.याप्रसंगी त्यांच्या सत्कार कार्यक्रमात सौ. शीतल चौरे (समुदाय आरोग्य अधिकारी) उपस्थित होत्या. गावात व परिसरात त्यांच्या यशाबद्दल अभिमानाची भावना व्यक्त होत असून, तरुणांसाठी त्यांचा संघर्षमय प्रवास प्रेरणादायी ठरत आहे.

# परळी शहरात प्रथमच खाजा अजमेरी कॉन्फरन्सचे भव्य आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

भारतातील सुप्रसिद्ध सूफी हजरत ख्वाजा गरीब नवाज अजमेर शरीफ यांच्या ८१४ व्या उरूसाच्या पवित्र निमित्ताने परळी शहरात प्रथमच खाजा अजमेरी र.ह. कॉन्फरन्सचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. आज व उद्या अशा दोन दिवस चालणाऱ्या या धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमाला परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आज शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर रोजी मगरीब नमाजनंतर पुरुषांसाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन आजाद नगर येथील खिजरा मशीद येथे संध्याकाळी मगरीब नमाज ता इशा नमाज पर्यंत करण्यात आले आहे. या व्याख्यानासाठी औरंगाबाद येथील



सुप्रसिद्ध धर्मोपदेशक हजरत व कारी जकीउल्लाह साहब हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, ते इस्लामिक जीवनमूल्ये, सूफी विचारधारा व समाजातील एकोपा यावर मार्गदर्शन करणार आहेत.

तर शनिवार, दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत महिलांसाठी एक दिवसीय तरबियती शिबिराचे आयोजन मदरसा दारूल उलूम अहले सुन्नत फैजाने औलिया, बरकत नगर येथे करण्यात आले आहे. या शिबिरात महिलांना धार्मिक शिक्षण, नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदाऱ्या व कौटुंबिक जीवनातील मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

हा संपूर्ण कार्यक्रम मौलाना हाफीज व कारी मुकरम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असून, परळी शहरात प्रथमच होत असलेल्या या सूफी कॉन्फरन्समुळे धार्मिक वातावरण निर्मितीबरोबरच सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात येत आहे.

मुस्लिम समाजाने या दोन्ही कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सिकलसेल रुग्णांना मदतीचा हात की जाचक अटींचा फेरा? २१ हजारांच्या उत्पन्न मर्यादेमुळे संजय गांधी योजनेचा लाभ अधांतरी!

## बोरद आरोग्यवर्धिनी केंद्रातील मेळाव्यात रुग्णांनी मांडल्या व्यथा; अटी शिथिल करण्याची शासनाकडे आर्त हाक

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

सिकलसेल सारख्या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या रुग्णांना आर्थिक बळ देण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना राबवल्या जातात. मात्र, या योजनांचा लाभ घेण्यासाठी लावण्यात आलेली '२१ हजार रुपये वार्षिक उत्पन्न' ही अट आजच्या महागाईच्या काळात रुग्णांसाठी मोठी अडचण ठरत आहे. बोरद येथील आरोग्यवर्धिनी केंद्रात आयोजित सिकलसेल मेळाव्यात हा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असून, शासनाने ही अट शिथिल करावी, अशी मागणी रुग्णांनी केली आहे. दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बोरद आरोग्यवर्धिनी केंद्रात सिकलसेल रुग्णांसाठी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून तळोदा महसूल विभागाचे सहाय्यक महसूल अधिकारी कैलास कुवर उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी बोरदच्या सरपंच अनिता भिलाव होत्या. यावेळी सहाय्यक महसूल अधिकारी कैलास कुवर यांनी संजय गांधी निराधार योजनेची सविस्तर माहिती दिली. सिकलसेल रुग्णांना या योजनेतून दरमहा १५०० रुपये मानधन मिळू शकते. परंतु, यासाठी तहसीलदार यांचा २१,००० रुपयांपर्यन्तचा उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, रेशन कार्ड व अन्य कायदेशीर कागदपत्रे अनिवार्य असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य अधिकारी डॉ. कुंजप्रिया पावरा यांनी रुग्णांना वेळेवर औषधोपचार घेण्याचे आवाहन करत महसूल विभागाच्या योजनांचा लाभ घेण्याचे सुचवले.



**२१ हजारांचा दाखला: रुग्णांची सर्वात मोठी डोकेदुखी**
मेळाव्यात उपस्थित रुग्णांनी महसूल अधिकाऱ्यांसमोर आपली व्यथा मांडली. आजच्या काळात वार्षिक २१ हजार रुपये उत्पन्न (म्हणजेच महिन्याला जेमतेम १७५० रुपये) असणे अशक्यप्राय आहे. मजुरी करण्यास गेले तरी दिवसाला तीनशे रुपये मजुरी मिळते दर महिन्याचा अंदाज केला तरी ९ हजार रुपये होतात मग महिन्याला १७५० रुपये उत्पन्न कसे असू शकते असा सवाल देखील यावेळी उपस्थित करण्यात आला.
अटीमध्ये उत्पन्न दाखला काढताना तलाठी व इतर अधिकारी सखोल चौकशी करतात. संबंधित रुग्णाच्या नावे अल्पशी शेती असली तरी हा दाखला मिळणे कठीण होते. या तांत्रिक अडचणीमुळे खरोखर गरजू असलेले शेकडो रुग्ण १५०० रुपयांच्या मदतीपासून वंचित राहत आहेत.जर सिकलसेल रुग्णांना औषधोपचारासाठी स्वावलंबी करायचे असेल, तर शासनाने ही वार्षिक उत्पन्नाची मर्यादा वाढवली पाहिजे किंवा ही अट पूर्णपणे रद्द केली पाहिजे, अशा भावना मेळाव्यात उपस्थित अनेक रुग्णांनी व ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होईल आणि त्यांना कोणावर अवलंबून राहावे लागणार नाही.
या मेळाव्याला बोरदचे उपसरपंच संतोष ढोडरे, ग्रामपंचायत सदस्य जुल्फेकार तेली, ग्रामविकास अधिकारी विजय पाटील, संदीप रहसे यांसह परिसरातील अनेक गावांचे सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने सिकलसेल रुग्ण व ग्रामस्थ उपस्थित होते.

# तळोदा पंचायत समितीत पेसा दिन उत्साहात साजरा आदिवासी स्वशासनाच्या बळकटीकरणाचा संकल्प

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

आदिवासी भागातील ग्रामसभांना अधिकार प्रदान करणाऱ्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आदिवासी समाजाचा सहभाग वाढवणाऱ्या 'पेसा' कायद्याच्या गौरवार्थ, तळोदा पंचायत समिती कार्यालयात 'पेसा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने तालुक्यातील ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक आणि कर्मचाऱ्यांनी पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त केला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सहाय्यक गट विकास अधिकारी काशिनाथ पवार यांनी भूषवले. यावेळी मंचावर विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) भैयासाहेब निकुंबे, विस्तार अधिकारी डी.डी. पाटील, सहाय्यक लेखा अधिकारी संजय चौधरी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी माधुरी कोकणी आणि पेसा तालुका व्यवस्थापक विलास बोरसे आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना काशिनाथ पवार यांनी पेसा कायद्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, आदिवासी संस्कृतीचे जतन आणि जल-जंगल-जमीन यांवर स्थानिक समुदायाचे अधिकार अबाधित राखण्यासाठी पेसा कायदा हे एक प्रभावी शस्त्र आहे. ग्रामसेवकांनी आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांनी ग्रामसभांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा. तालुका व्यवस्थापक विलास बोरसे यांनी पेसा अंतर्गत मिळणारा निधी आणि त्याचा विनियोग याविषयी तांत्रिक माहिती दिली.
या सोहळ्याला तळोदा तालुक्यातील सर्व ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक आणि पंचायत समितीमधील विविध विभागांचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# परळी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रानबा गायकवाड कार्याध्यक्षपदी नितीन ढाकणे तर शहराध्यक्षपदी शेख मुकरम

## ६ जानेवारी रोजी भव्य दर्पण दिनाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**परळी | प्रतिनिधी**

परळी शहर व तालुका पत्रकार संघाची २०२६ या नवीन वर्षाची कार्यकारणी नुकतीच निवडण्यात आली. तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दैनिक सम्राटचे प्रतिनिधी रानबा गायकवाड यांची तर शहराध्यक्षपदी दैनिक सिटीजनचे प्रतिनिधी शेख मुकरम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येत्या ६ जानेवारी रोजी परळी शहरात भव्य दर्पण दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.



परळी शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे दिनांक २५ डिसेंबर रोजी दैनिक पुण्यनगरीचे प्रतिनिधी धनंजय आरबुने यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार संघाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत परळी तालुका व शहर पत्रकार संघाची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. यामध्ये तालुका पत्रकार संघाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार दैनिक सम्राट चे प्रतिनिधी रानबा गायकवाड, उपाध्यक्ष पत्रकार सय्यद सबात अली,तालुका कार्याध्यक्ष दैनिक अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे, तालुका उपाध्यक्ष अनुप कुसुमकर, सचिव दैनिक बीड चौफेरचे बालाजी ढगे, सहसचिव शेख मुदस्सीर,तर शहराध्यक्षपदी दैनिक सिटीजनचे प्रतिनिधी शेख मुकरम, शहर उपाध्यक्ष समीर इनामदार, सचिव दैनिक रणझुंजार चे पत्रकार संतोष जुजगर, सहसचिव दैनिक लोकमत समाचार चे पत्रकार शेख अफसर तर कार्यकारणी मध्ये गावकरीचे पत्रकार जगदीश शिंदे, दैनिक जंग बीड, पत्रकार बाबा शेख, पत्रकार अमोल सूर्यवंशी, मुंबई जंगचे संपादक बालासाहेब मुजमुले याबरोबरच सल्लागार म्हणून ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे, धनंजय आरबुने, जगदीश शिंदे, भगवान साकसमुद्रे सहआदींचे निवड करण्यात आली आहे. दरम्यान तेथे सहा जानेवारी २०२६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा दर्पण दिन परळी शहरात भव्य प्रमाणात साजरा करण्यात येणार असल्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.या बैठकीचे सुत्रसंचलन दैनिक पुण्यभुमीचे पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी केले.

# स्वरूप ठोंबरे यांची एअर फोर्स मध्ये फ्लाईंग ऑफिसर पदी निवड; केज येथे सत्कार



दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

तालुक्यातील उंदरी येथील भूमिपुत्र स्वरूप बिभीषण ठोंबरे यांची संरक्षण प्रबोधनी द्वारे एअर फोर्स मध्ये फ्लाईंग ऑफिसर पदी निवड झाली. जिद्द मेहनत करून यश संपादन केले आणि केज तालुक्याचे नाव मोठे केले. लवकरच देशसेवा करण्यासाठी स्वरूप रुजू होणार आहे याबद्दल केज येथे सत्कार करण्यात आला.
राहुल भैया देशमुख, विनोद गुंड, छावाचे जिल्हा प्रमुख शिवाजी ठोंबरे आदींच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे. स्वरूपचा आदर्श घेऊन युवकांनी यश संपादन करावे असे मत राहुल देशमुख यांनी व्यक्त केले. निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे

# खडक मांजरी (ता. लोहा) येथे वारंवार वीजपुरवठा खंडित; ग्रामस्थांचे जीवन विस्कळीत

दैनिक वादळ वार्ता
**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील खडकमांजरी गावात गेल्या अनेक महिन्यांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा गंभीर प्रकार सुरू असून, दर दोन महिन्यांत तब्बल पंधरा-पंधरा दिवस वीज नसल्याने ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.
वीज नसल्यामुळे गावातील नागरिकांना अंधारात घरकामे करावी लागत असून, महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.
गावात मच्छरांचा प्रचंड त्रास वाढला असून, त्यामुळे आजारपण पसरत आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर याचा मोठा परिणाम होत असून, परीक्षेच्या काळातही अंधारात बसून अभ्यास करावा लागत आहे. विशेषतः वृद्ध नागरिकांना या परिस्थितीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.
पावसाळ्यात पाऊस व वाऱ्यामुळे वीजपुरवठा खंडित होतो हे समजू शकते, मात्र सध्या थंडीचा कडाका असतानाही आठ-आठ, दहा-दहा, तर कधी पंधरा-पंधरा दिवस वीज नसते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. याउलट वीज बिल मात्र नियमितपणे व जास्त प्रमाणात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.
वीज नसल्यामुळे दळण, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत गरजांवर मोठा परिणाम होत आहे. खेडेगावातील रस्ते खराब असून रात्री पोलवर लाईट नसल्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे.
या समस्येबाबत ग्रामस्थांनी वारंवार वीज कार्यालयात फोन करून तक्रारी केल्या, प्रत्यक्ष भेटी दिल्या, लेखी निवेदने सादर केली, लाईनमन व स्थानिक कार्यकर्त्यांनाही माहिती दिली. इतकेच नव्हे तर मतदारसंघातील आमदारांनीही वीज कार्यालयातील कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या तरीसुद्धा संबंधित कर्मचारी टाळाटाळ करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.
या संपूर्ण प्रकारामुळे खडक मांजरी गावातील महिला भगिनी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. संबंधित वीज वितरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने या गंभीर समस्येची दखल घ्यावी व गावात नियमित व सुरळीत वीजपुरवठा सुरू करावा, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.
जर लवकरात लवकर उपाययोजना केल्या नाहीत तर ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



# नंदुरबार: वनरक्षक-वनपालांच्या अडचणींबाबत वरिष्ठ वन अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी | प्रतिनिधी**

नंदुरबार विभागीय वनरक्षक-वनपाल संघटनेच्या वतीने वनरक्षक व वनपाल यांच्या विविध प्रलंबित अडचणींबाबत चर्चा करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत उपवनसंरक्षक संतोष सस्ते (भा.व.से.) तसेच सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी डॉ. मकरंद गुजर यांची सदिच्छा भेट घेऊन वनकर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले.
प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा
या प्रसंगी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने संतोष सस्ते आणि डॉ. मकरंद गुजर यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व संघटनेचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर वनरक्षक-वनपाल व इतर वनकर्मचाऱ्यांच्या २० महत्त्वाच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व मुद्द्यांवर सहकार्याची भूमिका घेत हे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे. बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे व मागण्या: बैठकीत वनकर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक विषय मांडण्यात आले, ज्यामध्ये खालील मुद्द्यांचा समावेश होता:
आर्थिक लाभ: प्रोत्साहन भत्ता फरकासह मिळणे, वेतन व भत्ते वेळेत अदा करणे आणि गणवेश भत्ता मिळणे.
प्रशासकीय कामे: सर्व्हिस बुक ऑनलाइन अद्ययावत करणे, ज्येष्ठता यादीतील दुरुस्ती आणि पदोन्नती प्रक्रियेला गती देणे.पारदर्शकता व सुरक्षा: बदली प्रक्रिया पारदर्शक करणे, वनकर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देणे आणि गस्ती साहित्याचा नियमित पुरवठा करणे.
नुकसान भरपाई: मानव-वन्यजीव संघर्ष व पीक नुकसान प्रकरणे तातडीने निकाली काढणे.
**पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**
या भेटीदरम्यान संघटनेचे विभागीय अध्यक्ष अरविंद निकम, राज्यस्तरीय सहसचिव दीपक जमदाडे, महिला उपाध्यक्ष सोनल बोरसे, सचिव भरत परदेशी, उपाध्यक्ष कल्पेश अहिरे, खजिनदार भानुदास वाघ, सह-खजिनदार भूपेश तांबोळी, वृत्तीय संघटक युवराज भाबड तसेच संघटक देवमन सूर्यवंशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077